(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या प्रगती विषयक विचार आणि कार्य

**प्रा. सुजाता संजय चोपडे** मराठी विभाग प्रमुख कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

---

**प्रस्तावना**

भारतीय इतिहासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असामान्या प्रतिभासंपन्न कायदे पंडित होते. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र अशा अनेक शास्त्रात ते विव्दान होते. त्यांना युगपुरूष म्हणून ओळखले जाते हजारो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय समाज व्यवस्थे विरूध्द बंड पुकारण्याचे काम त्यांनी केले डॉ. बाबासाहेबांच्या कालखंडात आणि त्यापूर्वीच्या काळात स्त्रियांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. मुलीचा जन्म होणं दुखद घटना समजली जायची पंरतु बाबासाहेबांनी स्त्रिला महत्वाचे मानले आहे.

मानव जातीच्या इतिहासाचा इतकाच स्त्रियांच्या अन्यायाच्या छळाचा इतिहास पुरातन आहे. पुरूषसत्ताक जाती व्यवस्थेला जसा धर्माचा आधार दिला गेला तसा स्त्रियावरील जाचक बंधनाना आधार दिला. स्त्रियांचे आर्थिक अधिकार संपविण्यात आले स्त्रियांना परावलंबी बनविण्यात आले त्यातून स्त्रियांचे माणूसपणच नाकारले आणि समाजव्यवस्थेत स्त्रिला दुय्यम ठरविले त्यामुळे कुठल्याही अन्याय अत्याचाराच्या बळी स्त्रिया ठरल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा संस्कृतीचे निर्माते आहेत की ती संस्कृती स्त्रीचा संपूर्ण माणूस म्हणून सन्मान करणारी संस्कृती आहे. भारताच्या संविधानात स्त्री-पुरूष यांच्या विषाता नष्ट केली आहे. स्त्री ही संविधानात अंतर्भूत भारताच्या लोकामधील सन्मानीय व्यक्ती आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री विषयक विचार-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री विषयक भूमिका मांडताना असे म्हटले आहे की स्त्रीने आपल्या पती, मुलाबाळांच्या आपल्या कुटुंबाचा व कुळाचा नावलौकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून असतो. स्त्रीने पतीची मैत्रीण बनून त्यांच्या कार्यात सहकार्य करावे मात्र पतीने गुलामासारखे वागवल्यास खंबीरपणे नकार द्यावा, समतेसाठी आग्रह धरावा असे सांगतात. व्यक्तीने ऐश्वर्या पेक्षा नीतीने जीवन कठंणे महत्वाचे आहे. स्त्रियांची प्रगती म्हणजेच खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती असे मोजमाप करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रियांच्या संघटनेवर मोठा विश्वास होता. त्यासाठी स्त्रियांना विश्वासात घेवून समाजाची सुधारणा करता येवू शकते असे त्यांचे मत होते. स्त्रियांच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. समाजातील जर दोष नाहीसे करायचे असतील तर स्त्रियांचे कार्य आणि मदत यावर विश्वास ठेवायला हवा. कोणत्याही कठीण कार्यात पुरूषासोबत स्त्रिया सहभागी झाल्यातर त्या यशस्वीपणे पार पाडू शकतात. अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची खात्री असल्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीवर अधिक भर दिला पाहिजे.

**स्त्री मुक्तीच्या कार्यास चालना-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री मुक्ती चळवह गतीमान करण्यासाठी समाज प्रबोधन आणि कायद्याचा आधार घेतला. स्त्री मुक्तीबाबत विचार मांडताना ते म्हणतात सामाजिक चळवळ ही केवळ पुरूषांनीच चालवावी असे नाही तर त्या मध्ये स्त्री सहभाग सुध्दा महत्वाचा असतो. मुलींचे लग्न करून त्यांच्यावर वैवाहिक जीवनाच्या जबाबदाऱ्या लादू नका, त्यांना शिक्षण होवू द्या असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात लग्नानंतर पत्नीला समान अधिकार द्या, ती गृहीणी असली तरी गुलाम असता कामा नये हे बाबासाहेबांचे विचार स्त्री-पुरूष समानतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. डॉ. बाबासाहेबांनी महात्मा फुले, कबीर आणि भगवान गौतमबुध्दां कडून स्त्री मुक्तीची वैचारिक पार्श्वभूमी लाभली होती.

**स्त्री शिक्षण विषयक कार्य-**

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या विचार आणि कृतींतून सतत स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. महाड येथील समता संग्रामाच्या वेळी स्त्रियांना उद्देशून बोलताना ते म्हणाले होते की 'ज्ञान आणि विज्ञान' हे फक्त पुरूषांसाठीच नाहीतर प्रत्येकाने आपल्या मुलीला शिक्षण दिले पाहीजे. आखिल भारतीय महिला परीषदेत त्यांनी स्त्रियांना शिक्षित व्हा, मुलांना शिकवा तरच देशाची प्रगती होईल असा संदेश दिला. कुटुंबातील स्त्री शिक्षीत असेल तर संपूर्ण कुटुंब सुधारेल मुलींना उपयुक्त आणि व्यवहारोपयोगी शिक्षण द्यावे असे सांगूर त्यांनी दलित स्त्रियांच्या हातात लेखनी दिली. स्त्री वर्गात शैक्षणिक जागृती निर्मान केली. १९२४ मध्ये नागपूर कन्या शाळा उभारण्यात आली. अंजनाबाई देशभ्रतार यांच्या सहकार्याने अस्पृष्य मुलींचे अनाथालय चालविण्यात आले. मुलांना व मुलींना १४ वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे अशी तरतूद संविधानात त्यावेळी करण्यात आली.

**स्त्री विषयक कायदे-**

कोणत्याही देशाची प्रगती देशातील स्त्रियांच्या प्रगतीवर अवलंबून असते. भारतातील सर्वधर्मिय स्त्रिया सक्षम होण्यासाठी त्यांनी सामाजिक चळवळ सुरू केली. या चळवळीला गतिमान करण्यासाठी समाज प्रबोधन आणि कायदा करण्यात आला स्त्रियांमधील प्रेरक शक्ती जागृत करण्यासाठी त्यांनी महिला परिषदा घेतल्या. भारतीय महिलांची आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरी कायदयाच्या माध्यमातून नष्ट केली. भारतीय संविधानाच्या मुलभूत अधिकारामध्ये समतेचा अधिकार मान्य करण्यात आला, त्यानुसार स्त्री पुरूष भेद नष्ट करून सर्व नागरीकांनी समानता देण्यात आली . गिरणी, कारखाने, शेतात काम करणाऱ्या स्त्रियांना, खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना सुध्दा पगारी रजा, प्रस्तुती रजा, लहान मुलांसाठी पाळणाघरे असावी, तसेच स्त्रियांना पुरूषांबरोबर मतदानाचा अधिकार असावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते.

तसेच स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावे यासाठी हिंदू कोडबिल तयार करून स्त्रियांना विशेष अधिकार देण्यात आले. जसे स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगीचा अधिकार, व्दिभार्या प्रतिबंध कायदा, वारसा, हक्क, दत्तक कायदा, व्यक्ती स्वातंत्र इत्यादी बाबींना कायदयाचे रूप दिले. त्यामुळे भारतीय स्त्रियांना विकासाचा मार्ग मोकळा झाला. म्हणूनच वर्तमानकाळात कारकून पासून ते जिल्हाधिकारीपर्यंत सर्व जबाबदाऱ्या स्त्रियां आपल्या सामर्थ्यांच्या जोरावर पार पाडताना दिसतात.

**डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे जातिविषयी विचार-**

जातीव्यवस्था आणि स्त्री या दोन गोष्टी एका विलक्षण पध्दतीने एकमेकींमध्ये गुंतल्या आहेत. स्त्रीला जातीचे प्रवेशद्वार म्हटले जाते. स्त्रीयांमुळेच जाती व्यवस्था जिवंत ठेवली जाते. जाती व्यवस्था स्त्रीवर नियंत्रण ठेवते. जाती अंतर्गत विवाह होणे हे स्त्री दास्याने आणि जातीचेही संरक्षक कवच आहे. जो पर्यंत स्त्री जात मुक्ती होत नाही तो पर्यंत स्त्री मुक्त होऊ शकत नाही. याचाच अर्थ स्त्री आणि जाती मुक्ती हे दोन वेगवेगळे प्रश्न नाहीत तर तो एकच प्रश्न आहे. एक प्रश्न सोडवला तर दुसरा आपोआप सुटेल असे डॉ. बाबासाहेबांचे मत आहे. स्त्रीयांचे आणि जातीचे जटिल कार्य धर्माने केले आहे. म्हणूनच स्त्री मुक्तीसाठी आणि जातिमुक्तीसाठी धर्ममुक्तीही आवश्यक आहे. धर्मवादी पुरूषाने जसे पुरूषाने श्रेणी मुक्त विषमतेमध्येच डांबलेले आहे. धर्म टिकवण्यासाठी जातीत लग्न करणे आवश्यक असते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय लग्न व्यवस्थेला प्रोत्साहन दिले आहे. वर्ण व्यवस्थेमध्ये स्त्रियांना शुद्रापेक्षाही खालचा दर्जा दिला जात होता यातूनच संविधानाने स्त्रियांना दर्जा दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री सबलीकरणा विषयी विचार जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. स्त्रीयांना समाजात सन्मान आणि प्रतिक्षा प्राप्त करून देण्यासाठीचे कार्य त्यांनी केले. अस्पृश्य आणि स्त्रियांचा सर्वांगीण विकास करणे हे बाबासाहेंबाचे अत्यंत महत्वाचे ध्येय होते. त्यांचबरोबर स्त्रीयांना सक्षम करून जनजागृती आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरू केले, त्यातून लोकजागृती करून महिलांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. तसेच हिंदू कोडबीलमध्ये नवीन स्वरूपात हिंदू स्त्रीयांना नवीन जीवन प्रदान केले जीवनात सशक्तपणे उभे राहण्यासाठी लागणारे बळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले, स्त्री पुरूषांना समान व सहशिक्षण देण्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भर दिले. एवढेच नसून महिला सक्षमीकरणाची सुरवात त्यांनी आपल्या घरापासून म्हणजेच स्वता:च्या पत्निला शिकवून केली. स्त्री सक्षमीकारणत नवीन पाउुल टाकत महत्वाचे कार्य केले. भारताला विकसनशील बनवायचे असेल तर स्त्री प्रगतीशिवाय पर्याय नाही. देशाच्या विकासाचे चित्र डोळयासमोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या अधोगतीला कारणीभूर ठरलेल्या मनुस्मृतीचे दहन केले.

**संदर्भ –**

1. डॉ. यशवंत मानेहर - नव संस्कृतीचे जनक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन, औरंगाबाद
2. डॉ. उत्तम सावंत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर : गौरव ग्रंथ – निर्मल प्रकाशन नांदेड.
3. भास्कर लक्ष्मण भोळे - संदर्भ दलित चळवळीचा, बजाज पब्लिकेशन अमरावती
4. डॉ. सुनंदा अहिरे व डॉ. उमा साळुंखे – 'स्त्री अभ्यासाच्या दिशा' अथर्व पब्लिकेशन वर्धा'